अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १३१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## लाचखोर सहाय्यकाला एक दिवसाची कोठडी

**सोलापूर** : सोलापूरच्या माध्यमिक शिक्षण विभागातील लाचखोर वरिष्ठ सहाय्यक घनशाम म्हस्के यास शुक्रवारी न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. घनशाम हा एका शिक्षकाकडून वीस हजाराची लाच स्वीकारताना गुरूवारी रंगेहाथ सापडला होता. भर कार्यालयात काम करत असताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने त्याच्यावर ही कारवाई केली होती. ताब्यात घेतल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. दरम्यान लाच लुचपत प्रतिबंधक खात्याच्या कारवाईचा अहवाल आल्यानंतर खात्यांतर्गत म्हस्केवर कारवाई करण्यात येईल, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.




# ऊस बिलाचे ३०० कोटी थकले साखर कारखानदार हाजिर हो!



**बुधवारी साखर आयुक्त कार्यालयात सुनावणी**

■ कारखान्याचा आर्थिक ७/१२ घेऊन हजर राहण्याचे आदेश

■ अध्यक्ष आणि संचालकांच्या संपत्ती जप्त करुन शेतकऱ्यांची देणी देण्याचा साखर संचालकांकडे रेटा

**सोलापूर/खास प्रतिनिधी**



**यंदाच्या गाळप हंगामासाठी ऊस घातलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सोलापूर विभागातील सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातील १६ कारखान्यांकडे एफआरपीची सुमारे ३०० कोटींची थकबाकी राहात आहे. या संबधित कारखान्यांवर आरआरसी कायद्याप्रमाणे कारवाई प्रस्तावित केली असून या संबधित कारखानदारांना बुधवार (दि.१३) सकाळी ११ वाजता पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयात सुनावणीसाठी बोलावण्यात आले आहे. या कारखान्याचे अध्यक्ष किंवा व्यवस्थापकीय संचालक यांनी सक्षम हजार राहून थकबाकीसंबंधी आपले लेखी म्हणणे सादर करण्याचे आदेश सोलापूर विभागाचे प्रादेशिक सहसंचालक प्रकाश अष्टेकर यांनी आदेश काढले आहेत.**

विशेषत्वे, नोटिसा बजावलेल्या कारखानदारांनी सुनावणीस येताना बँकेकडे तारण ठेवलेला साखर साठा, तारण नसलेली कारखान्याची सर्व जंगम व स्थावर मालमत्ता यांच्या संपूर्ण माहितीसह उपस्थित राहणे बंधनकारक केले आहे.

> “ सहकारी व खासगी साखर कारखान्यांना १९६६ चे ऊस सहकार कायद्यानुसार, ऊस उत्पादकांना १५ दिवसात ऊसाची एफआरपीप्रमाणे बिले मिळायला हवीत. बिले देणे कारखानदारांना बंधनकारक आहे. मात्र, गाळप संपण्याची वेळ आली तरी सोलापूर विभागातील कारखानदारांकडून शेतकऱ्यांची बिले मिळत नाहीत. ज्या शेतकऱ्यांची बिले थकली आहेत, त्यांना थकबाकीवर १५ टक्के याप्रमाणे व्याजासह बिले देण्यास कारखानदारांना भाग पाडावे, यासाठी आपण साखर आयुक्त यांच्याकडे पाठपुरावा करीत आहोत. शिवाय पालकमंत्र्यांकडेदेखील आपण पाठपुरावा करीत आहोत. आरआरसीप्रमाणे १६ कारखान्यांवर कारवाई प्रस्तावित केली आहे. बुधवारी सुनावणी ठेवली आहे. कारखान्याचे अध्यक्ष आणि संचालकांच्या संपत्ती जप्त करुन शेतकऱ्यांची देणी देण्याची आमची मागणी आहे. त्यासाठी प्रसंगी आम्ही रस्त्यावर उतरुन आंदोलन करु.
>
> **–प्रा.सुहास पाटील, ऊस दर नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य**

### सुनावणीसाठी ‘या’ कारखान्यांना नोटीस

भैरवनाथ शुगर वर्क्स, आलेगाव (ता. माढा), लोकनेते बाबूरावआण्णा पाटील ॲग्रो इंडस्ट्रीज, लक्ष्मीनगर अनगर (ता. मोहोळ), अवताडे शुगर्स, लि. नांदूर (ता. मंगळवेढा), धाराशिव शुगर लि. वाकी शिवणे (ता. सांगोला), इंद्रेश्वर शुगर मिल्स प्रा. भगवंतनगर, उपळाई (ता.बार्शी), जकराया शुगर लि. वटवटे (ता. मोहोळ), भैरवानाथ शुगर वर्क्स लि.लवंगी( ता. मंगळवेढा), युटोपियन शुगर लि. कचरेवाडी (ता.मंगळवेढा), लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रीज लि. बीबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर), लोकमंगल शुगर इथेनॉल ॲन्ड कोजनरेशन इंडस्ट्रीज, भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर), सिद्धनाथ शुगर मिल्स लि. तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर), श्री सिद्धेश्वर सह. साखर कारखाना कुमठे (ता. उत्तर सोलापूर), बबनरावजी शिंदे शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. तुर्कपिंपरी (ता.बार्शी), विठ्ठल सह. साखर कारखाना वेणूनगर (ता. पंढरपरपूर), धारशिव शुगर मिल्स लि. चोरखळी (ता. कळंब जि. धाराशिव), आणि भैरवानाथ शुगर्स प्रा.लि. (शिवशक्ती सहकारी साखर कारखाना)

## विना परवाना ऊस गाळपाचे सोलापूर जिल्ह्यात धाडस

**सोलापूर** : यंदाच्या गाळप हंगामासाठी साखर आयुक्त कार्यालयाकडून निर्धारीत वेळेत गाळप परवाना न घेता धाडसाची मर्दुमकी दाखवित कारखान्यांकडून गाळप सुरु ठेवण्याचा प्रकार राज्यात केवळ सोलापूर जिल्ह्यातील साखर सम्राटांनी केला. याबद्दल साखर आयुक्त कार्यालयाने कारवाईचा हिसका दाखविला आहे. चार कारखान्यांना तब्बल २० कोटी ३२ लाखांचा दंड ठोठावला असून येत्या सात दिवस जिल्हा कोषागार कार्यालयात दंडाची रक्कम भरण्याचे आदेश साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमणार यांनी काढले आहेत.

दरम्यान दंडात्मक कारवाई झालेल्या साखर कारखान्यांचा विचार करता भारतीय जनता पक्षाशी संबंधित तीन साखर कारखाने असून एक कारखाना काँग्रेसच्या माजी मंत्र्याशी संबंधित आहे.

या कारवाईमुळे दंडाची नोटीस बजावलेल्या साखर कारखान्यांमध्ये मंगळवेढ्यातील संत दामाजी सहकारी साखर कारखाना, मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखाना, अक्कलकोट तालुक्यातील मातोश्री लक्ष्मी शुगर आणि गोकुळ शुगर यांचा समावेश आहे. यामध्ये सर्वाधिक दहा कोटी २२ लाख ५० हजार रुपये दंड हा संत दामाजी साखर कारखान्याला करण्यात आलेला आहे.

गोकुळ शुगर या कारखान्याला पाच कोटी ७० लाख ९७ हजार पाचशे रुपये, भीमा सहकारी साखर कारखान्याला तीन कोटी १३ लाख ९७ हजार पाचशे रुपये, तर मातोश्री लक्ष्मी या साखर कारखान्याला एक कोटी २४ लाख ८० हजार रुपये दंड आकारण्यात आलेला आहे, त्यामुळे या कारखान्यांपुढे आता नवा पेच निर्माण झाला आहे. विना परवाना गाळप हंगाम सुरू करण्याचे धाडस राज्यात केवळ सोलापूर जिल्ह्यातील साखर काखान्यांनीच दाखवले आहे. मंगळवेढ्यातील संत दामाजी कारखाना हा भाजपच्या माजी आमदाराच्या समर्थकांच्या ताब्यात आहे, तर पंढरपुरातील भीमा कारखाना हा भाजपच्या राज्यसभेच्या खासदाराचा आहे. अक्कलकोटमधील गोकुळ शुगर हा कारखाना भाजपच्या माजी जिल्हाध्यक्षाच्या मुलाच्या ताब्यात आहे, तर अक्कलकोटमधील मातोश्री लक्ष्मी शुगर हा काँग्रेसच्या माजी मंत्र्यांच्या नेतृत्वातील आहे, त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच शासकिय देणी थकविण्यात भाजपचेच कारखानदार आघाडीवर असल्याचे दिसून येते.

## नियमाच्या पायमल्लीने ५ लाख लाडक्या बहिणी योजनेतून बाहेर...

■ दूध पोळल्यानंतर ताकही फुंकून प्यावे लागते

■ सरकारला उशिरा सुचलेले शहाणपण

**सोलापूर/प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळवून दिलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतील बोगसगिरी समोर आली आहे.त्यामुळे या योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे ५ लाख महिलांना मोठा झटका बसला आहे. कारण या महिलांचे अर्ज बाद ठरले आहेत. त्यामुळे या महिलांना आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार नाही. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करुन या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

या योजनेच्या माध्यमातून राज्यभरात २ कोटींपेक्षा जास्त महिलांच्या बँक खात्यात राज्य सरकारकडून १५०० रुपयांची आर्थिक मदत दर महिन्याला केली जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी या योजनेची घोषणा केली होती. या योजनेच्या माध्यमातून महिलांना १५०० रुपयांची आर्थिक मदत मिळत असल्याने अनेक महिलांनी महायुतीच्या उमेदवारांना विधानसभा निवडणुकीत भरभरुन मतदान केले होते. तसेच निवडणुकीत जिंकून आल्यानंतर लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक मदतीत ६०० रुपयांनी वाढ करु म्हणजे २१०० रुपये देऊ, अशी घोषणा महायुतीकडून करण्यात आली होती. त्यामुळे आता आगामी काळात राज्याचा अर्थसंकल्प सादर करत असताना याबाबत घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. पण त्या आधीच लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ५ लाख महिलांना मोठा झटका बसला आहे. निकषांमध्ये बसत नसल्यामुळे राज्य सरकारकडून ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे अशाप्रकारची कारवाई आणखी महिलांवर केली जाण्याची शक्यता आहे.

### लाभार्थी महिलांची संख्या २ कोटी ४१ लाखांवर

राज्य सरकारकडून गेल्या १५ दिवसांपासून लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केलेल्या महिलांची छाननी केली जात आहे. यामध्ये जानेवारी महिन्यात ५ लाखांपेक्षा जास्त महिलांना नियमांची पायमल्ली केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांचे अर्ज छाननी बाद करण्यात आले आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांची संख्या ही २ कोटी ४१ लाखांवर येऊन पोहोचली आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यापर्यंत ही छाननी होणार आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या आणखी महिलांची नावे कमी होण्याची शक्यता आहे.

### लाभार्थी महिलांच्या संख्येत मोठी घट होण्याची शक्यता

लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी मार्च महिन्यापर्यंत पूर्ण झाल्यानंतर लाभ घेणाऱ्या महिलांचा मोठा आकडा घटण्याची शक्यता आहे. अद्याप आयकर विभागाकडून ही माहिती आलेली नाही. जिल्हा पातळीवर स्वच्छेने पैसे माघारी करणाऱ्या महिलांचा डेटा गोळा करण्याचे काम अजूनही सुरु आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांमध्ये योजनेचा लाभ सोडणाऱ्या किंवा लाभार्थी महिलांच्या संख्येत घट होणाऱ्यांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, आतापर्यंत कमी झालेल्या ५ लाख लाभार्थ्यांमधील दीड लाख लाभार्थी महिला या ६५ वर्षांवरील असल्याची माहिती आहे.

### ताकही फुंकून प्यावे लागते

गोरगरीब,पीडित वर्गासाठी ही योजना अत्यंत चांगली आहे पण यात नियमांची पायमल्ली करून मध्यमवर्गीय आणि श्रीमंत वर्गानेही घुसखोरी केली.अर्जांची विशाल संख्या पाहाता हजारो कोटींची रक्कम कोठून उपलब्ध करणार,असा प्रश्न जाणकारांनी उपस्थित केला होता.त्याचे उत्तर शिंदे सरकारकडे नव्हते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकडे गांभिर्याने लक्ष दिले व अर्जांची छाननी करण्याचा निर्णय घेतला.यात नियमांची पायमल्ली करून या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न सुरू होता.आता त्याला चाप बसला आहे.राज्याच्या तिजोरीत मोठी बचतही होणार आहे.दूध पोळल्यानंतर ताकही फुंकून प्यावे लागते,हा त्यातलाच प्रकार आहे.





## पंढरीत अडीच लाख भाविक दाखल
## हरिनामाच्या गजराने विठू नगरी दुमदुमली

**पंढरपूर** : माघी एकादशी सोहळा शनिवारी होणार आहे या निमित्य विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात अडीच लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे.

माघी यात्रेसाठी गेल्या तीन दिवसापासून पंढरपुरात भाविक दाखल होऊ लागले आहेत भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने ४०० जादा एसटी बसेस सोडल्या आहेत तर रेल्वेने जादा फेऱ्या सुरू केल्या आहेत. खासगी वाहनाने भाविक येत आहेत. यामुळे पंढरीत भाविकांची गर्दी वाढू लागली आहे पंढरीत आलेले भाविक विठ्ठलाचे दर्शन घेतात. यामुळे मंदिर समितीने विठ्ठलाचे मुखदर्शन व पददर्शन अशा दोन वेगवेगळ्या दर्शनारांगा सुरू केल्या आहेत. पद दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. त्यामुळे मंदिर समितीने गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ दहा जादा दर्शन मंडप उभा केले आहेत.

या ठिकाणी भाविकांना पिण्याचे पाणी, चहा, नाश्ता भोजनाची सुविधा केली आहे. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर ठेवण्यात आली आहे. यात्रा मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे.

### २०० हून अधिक दिंडी दाखल

माघी यात्रेसाठी परगावहून दिंडी सोहळे येत असल्यामुळे या सोहळ्यांची सोय ६५ एकर येथे प्रशासनाने केली आहे. या ठिकाणी २०० हून अधिक दिंडी दाखल झाले असून या ठिकाणी चार लाख भाविकांची निवासाची सोय झाली आहे. या ठिकाणी प्रशासनाने भाविकांना २४ तास पिण्याचे पाणी वीज आरोग्य पोलीस बंदोबस्त दिला आहे. गेल्या दोन दिवसापासून पंढरपुरात भाविक दाखल होऊ लागल्यामुळे रस्त्यावर भाविकांची गर्दी दिसून येत आहे.

### तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



तेवढ्या पैशात ‘ईथेच’ बिझनेस टाकला असता तर..

| कल्याण |
| --- |
| 159-55-690 |

| मुंबई |
| --- |
| 115-78-134 |

## कांद्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी हवालदिल...

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापुरातील कांदा बाजारात गेली दोन ने ३८०० ते ४००० रूपये प्रतिक्विंटल अशी तेजी देणाऱ्या लाल कांद्याच्या भावात शुक्रवारी मोठी घसरण झाली. हे दर गेल्या १५ ते २० दिवसांच्या तुलनेत १३०० रूपये प्रतिक्विंटल इतकी घसरण झाली आहे.



शुक्रवारी किमान किंमत २०० रूपये तर कमाल किंमत ३५०० रूपये असा दर होता. यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. सोलापूर मार्केट यार्डात गेली चार पाच महिने कांद्याच्या भावात मोठा उच्चांक गाठला होता. परंतु कांद्याच्या आवक वाढल्याने कांद्याचा भाव हा स्थिरावला होता. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात कांद्याला ३८०० ते ४००० पर्यंत भाव होता. जानेवारी महिन्यापासून मात्र सातत्याने भाव खाली घसरत आले. मार्केटमध्ये उन्हाळी कांद्याची आवक थांबली आहे. नवीन येणारा कांदा हा ओलसर असल्याने मागील महिन्यापासून कांदा भावात मंदी दिसून येत आहे.

३८०० ते २२०० रूपय प्रति क्विंटल असे दर मागील आठवड्यात होते. तर कालच्या बाजारात १७०० ते २५०० असे प्रतिक्विंटल दर काल सोलापूर कांदा बाजारात पाहायला मिळाले. गेल्या काही दिवसांपासून लाल कांदा दरात सातत्याने घसरण सुरूच असून सोलापूर बाजारात कांदा भावात घसरण होताना पाहायला मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. या अचानक घसरलेल्या भावामुळे शेतकरी दुखावला आहे. उन्हाळी कांदा मार्चच्या शेवटच्या आठवड्यात बाजारात दाखल होणार आहे. नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये लागवड झालेला कांदा सध्या विक्रीस येत आहे. मागील तीन महिन्यांपासून पावसाळी लाल कांद्याची आवक

> “ कांदा लागवडीला खूप खर्च येत असतो, या पीक लागवडीला जेवढा खर्च लागतो, तेवढा नफा मिळावा एवढीच अपेक्षा असते. सोलापूर कांदा बाजारात कांद्याला भाव चांगला मिळतो म्हणून आम्ही कांदा एवढ्या लांबून कांदा येथे आणतो. परंतु अचानक भाव कमी मिळाला याचे दुःख आहे.
>
> **–मनोज पुजारी, कांदा शेतकरी, इटकळ**

> “ सोलापूर कांदा बाजारात १७५ गाड्यांची आवक झाली आहे. सध्या जो कांदा बाजारात येत आहे, तो कांदा पावसाळी कांदा असल्याने भावामध्ये तफावत दिसून येत आहे. कांदा भाव १००० ते ३२०० पर्यंत आहे. पुढेही कांदा भाव स्थिर राहण्याची शक्यता आहे. उन्हाळी कांदा मार्चच्या शेवटच्या आठवड्यात येईल. तेव्हा कांदा भावात बदल होऊ शकतो.
>
> **–उस्मान बागवान, कांदा व्यापारी,सोलापूर मार्केट यार्ड**

> “ सोलापूर येथील कांदा बाजारात एकूण १७५ ते १८० इतका कांदा मालाची आवक झाली आहे. फुरसुंगी मालाला चांगला भाव आहे. आणि मालाच्या आकारानुसार कांदा मालाला भाव मिळत आहे. लाल कांदाच्या भावात घसरण झाली आहे. एक नंबर माल, मिडियम माल आणि लहान माल असे विभाजन करून मालाचे भाव लावले जातात, कांदा भाव १००० ते ३२०० पर्यत बाजार भाव होता. बाजार भाव पुढे ही स्थिर राहणार आहे.
>
> **–विनोद पवार, कांदा व्यापारी सोलापूर**